# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठात ‘शरीराची ठेवण आणि हाडांचे आरोग्य’ विषयावर १४ मार्चला व्याख्यानाचे आयोजन

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, ‘स्वच्छ भारत - स्वस्थ भारत’ योजना व डायट कॉऊन्सिलिंग सेंटर, गृहविज्ञान विभाग यांचे संयुक्त विद्यमाने डॉ. संजीवनी गणोरकर यांचे ‘शरीराची ठेवण आणि हाडांचे आरोग्य’ या विषयावर व्याख्यान दि. १४ मार्च, २०१८ रोजी दु. ४.०० वाजता विद्यापीठाच्या डॉ.के.जी. देशमुख सभागृहात आयोजित करण्यात आले आहे.

व्याख्यानात हाडांचे विविध आजार आणि चुकीच्या शारीरिक हालचाल याद्वारे होणाऱ्या समस्यांवर भौतिक उपचारांबद्दल मार्गदर्शन करण्यात येईल. तरी या व्याख्यानाला जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. मनिषा काळे यांनी केले आहे.

---

## विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाच्यावतीने १४ मार्चला एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाच्यावतीने ‘समाजशास्त्र विषयातील पदव्युत्तर सत्र पद्धती समस्यां आणि आव्हाने’ या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि. १४ मार्च, २०१८ रोजी विद्यापीठ दृकश्राव्य सभागृहात करण्यात आले आहे. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, उद्घाटक म्हणून महाराष्ट्र राज्याचे मराठी समाजशास्त्र परिषद अध्यक्ष डॉ. सरोज आगलावे, तर प्रमुख अतिथी म्हणून मराठी समाजशास्त्र परिषदेचे कोषाध्यक्ष डॉ. राहुल भगत व समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.के.बी. नायक यांची उपस्थिती लाभणार आहे.

प्रथम सत्रात प्रमुख वक्ते म्हणून महाराष्ट्र राज्याचे मराठी समाजशास्त्र परिषद अध्यक्ष डॉ. सरोज आगलावे व एस.ए. कॉलेज, अकोलाचे डॉ. दिवाकर उंबरकर यांचे ‘समाजशास्त्र विषयातील पदव्युत्तर सत्रपद्धती-समस्या’ या विषयावर तर समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ.बी.एच. किर्दक व समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.के.बी. नायक यांचे ‘समाजशास्त्र विषयातील पदव्युत्तर सत्रपद्धती-आव्हाने’ या विषयावर व्याख्यान होणार आहे.

समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर राहणार असून डॉ. किशोर राऊत यांची उपस्थिती लाभणार आहे. तरी कार्यक्रमाला जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाच्यावतीने समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.के.बी. नायक यांनी केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १३/०३/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी